# डिचोली शिमगोत्सव मिरवणुकीचा निकाल जाहीर

## त्रिवेणी कला संघ, श्री मंडलेश्वर मंडळ शिरोडा, सख्या हरी सावई वेरे यांनी पटकवली पाहिली बक्षिसे

■ टीम दैनिक हेराल्ड



डिचोली : शिमगोत्सव समितीच्या विविध स्पर्धांचा निकाल जाहीर करताना आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये. गुंजन कोरगावकर, नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, मुख्याधिकारी नेहाल तळवणेकर, शंकर बेतकीकर, रामा परब व इतर.

**डिचोली, दि. २३ :** डिचोली शिमगोत्सव समितीतर्फे घेण्यात आलेल्या शिमगोत्सव मिरवणुकीतील सर्व स्पर्धांचे निकाल समितीचे अध्यक्ष आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये व सचिव नगरसेवक गुंजन कोरगावकर यांनी डिचोली पत्रकार कक्षात घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केले.

चित्ररथ स्पर्धेत पहिले बक्षीस त्रिवेणी कला संघ दुर्गाभाट फोंडा यांना प्राप्त झाले आहे. रोमटामेळ स्पर्धेतील पहिले बक्षीस श्री मंडलेश्वर मंडळ शिरोडा यांना लोकनृत्य स्पर्धेत पहिले बक्षीस सावयवेरेचा सख्याहारी सावईवेरे यांना, खुली वेशभूषा स्पर्धा लहान गटातील पहिले बक्षीस आरोही वेरेकर हिला, खुली वेशभूषा मोठा गट स्पर्धेतील पहिले बक्षीस शंकरनाथ पारवडकर याला, डिचोली तालुका पातळीवरील वेशभूषा स्पर्धा मोठा गटचे पहिले बक्षीस अवनी सुरज राऊत याला, तर डिचोली तालुका वेशभूषा स्पर्धा छोटा गटचे पहिले बक्षीस संस्कार गावकर याला प्राप्त झाले आहे.

सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे – चित्ररथ स्पर्धा – चित्ररथ स्पर्धा दुसरे बक्षीस महालक्ष्मी नागरिक समिती म्हार्दोळ फोंडा, तिसरे बक्षीस आडपई युवक संघ आडपई फोंडा, चौथे बक्षीस जय संतोषी माता खोर्लीम नागरिक समिती, पाचवे बक्षीस कासवाडा नागरिक समिती तळावली फोंडा, सहावे बक्षीस श्री देव बोडगेश्वर युवा संघ म्हापसा, उत्तेजनार्थ बक्षीसे श्रीकृष्ण हौशी मंडळ मडगाव, देवतेवाडा युवक मंडळ कुडचडे, राखणेश्वर युवक संघ बोरी फोंडा, शिवराय युवक मंडळ काले सांगे, श्री काजरेश्वर मंडळ कुचेली म्हापसा, श्री देव राष्टोळी कला मंडळ गिरी म्हापसा, श्री दामबाब प्रसन्न मडगाव, श्री शांतादुर्गा प्रसन्न मडगाव, श्री किंग माशेल, झरेश्वर बॉईज कुर्टी फोंडा, शंकर पार्वती गणेश मंडळ फोंडा, महालक्ष्मी बॉईज फोंडा यांना देण्यात आली.

रोमटामेळ स्पर्धा – रोमटामेळ स्पर्धेचे दुसरे बक्षीस सुयोग शिमगोत्सव मंडळ आडपई, तिसरे बक्षीस खांडेपार शिमगोत्सव मंडळ खांडेपार, चौथे बक्षीस स्वरसाई शिमगोत्सव मंडळ म्हापसा, पाचवे बक्षीस टोणयेश्वर शिमगोत्सव मंडळ साखळी यांना प्राप्त झाले.

लोकनृत्य स्पर्धा – लोकनृत्य स्पर्धेतील दुसरे बक्षीस सरस्वती कला मंडळ कुर्टी फोंडा, तिसरे बक्षीस विजया कला मंडळ फोंडा, चौथे बक्षीस टिटो स्पोर्ट्सअँड कल्चरल क्लब पैंगीण, पाचवे बक्षीस श्री नवदुर्गा कला व सांस्कृतिक मंडळ मडकई तर उत्तेजनार्थ बक्षीसे श्री घाडवंश लोकमांड केरी सत्तरी, श्री राम कला संघ फोंडा, सातेरी सेल्फ हेल्प ग्रुप वेलींग म्हार्दोळ, परशुराम कला संघ कानकोण, शिक्षा व्हिजन लेझीम ग्रुप डिचोली, सिद्धिविनायक लेझीम ग्रुप डिचोली यांना प्राप्त झाले.

अखिल गोवा लहान व मोठा गट खुली वेशभूषा स्पर्धा – अखिल गोवा खुली वेशभूषा स्पर्धा लहान गटातील दुसरे बक्षीस शौनक गडेकर, तिसरे बक्षीस विहान भगवंत महाले, उत्तेजनार्थ बक्षीस घनश्याम ताटे, प्रद्युम्न गावस यांना प्राप्त झाले.

अखिल गोवा खुली वेशभूषा स्पर्धा मोठा गट स्पर्धेत दुसरे बक्षीस धनंजय नाईक, तिसरे बक्षीस प्रमोद मोर्लेकर तर उत्तेजनार्थ बक्षिसे मदन तारी, जयेश दोहीफोडे, संदीप मयेकर व अपूर्वा बुगडे यांना प्राप्त झाली.

डिचोली तालुका लहान व मोठा गट वेशभूषा स्पर्धा – डिचोली तालुका वेशभूषा स्पर्धा मोठा गटाचे दुसरे बक्षीस साईप्रणव महेश राऊळ, तिसरे बक्षीस यशिका परेश नार्वेकर तर उत्तेजनार्थ बक्षीसे श्रवण सुबोध कांसार, सानवी देसाई आरव सुशांत कवळेकर, अथर्व अमीर वायंगणकर.

डिचोली तालुका वेशभूषा स्पर्धा छोटा गट दुसरे बक्षीस आस्था सावंत, तिसरे बक्षीस श्रीजा दत्तप्रसाद पळ तर उत्तेजनार्थ पक्षीसे शाश्वत पळ, समृद्धी वायंगणकर, अलिशा तारी, कृती कवळेकर, श्रीधा तेली, वेदांत मार्शल्ये व पूर्वी हळदणकर यांना प्राप्त झाली.

या पत्रकार परिषदेला डिचोलीचे नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, मुख्याधिकारी नेहाल तळवणेकर, समितीचे खजिनदार रामा परब, शंकर बेतकीकर, राजन कडकडे, रोहिदास पळ, डॉ. कौस्तुभ पाटणेकर, विश्वास गावकर, विश्वास गावस, संजय म्हापसेकर, नगरसेविका दीपा शिरगावकर, ॲड. रोहन शिरोडकर, सर्वेश चेंदवनकर, गोविंद परवार, रुद्रेश चणेकर, दीपक नानोडकर व इतरांची उपस्थिती होती.

पान १ वरून

### ओल्ड गोव्याची ओळख वाचवण्यासाठी धडपड सुरू!

सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीचे पीटर व्हिएगास यांनी सांगितले की, या प्रकल्पाबाबत नागरिकांना जागरूक करण्यासाठीच हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. जुने गोवा ग्रामपंचायतीचे सदस्य अंबर आमोणकर यांनी स्पष्ट केले की, हा प्रकल्प सहा महिन्यांपूर्वी ग्रामसभेत मांडण्यात आला होता, आणि सुधारित प्रस्ताव अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला. मात्र, प्रशासनाने कोणतीही अधिकृत माहिती ग्रामपंचायतीला दिली नाही. काही दिवसांपूर्वी परस्पर काम सुरू करण्यात आले. परंतु, ग्रामपंचायतीची कोणतीही संमती याला नाही. आम्ही खात्री देतो की या प्रकल्पाला परवानगी दिली जाणार नाही.पंचायत लवकरच अधिकाऱ्यांना बांधकाम थांबवण्याचे आदेश देणार असल्याचे त्यांनी सांगितले. गोवा ग्रीन ब्रिगेडचे संयोजक अव्हर्टिनो मिरांडा यांनी गोव्याच्या पर्यावरणासाठी लढा देण्याचे आवाहन करत सांगितले की, जर सरकारने लोकांचा आवाज ऐकला नाही, तर गोव्याचा नाश अटळ आहे. झाडे लावायला वर्षानुवर्षे लागतात, पण तोडण्यासाठी काही क्षणच पुरेसे असतात. पर्यावरण कार्यकर्ते स्वप्नेश शेर्लेकर यांनी सरकारच्या भूमिकेवर टीका करत म्हटले, आपण सतत संघर्षशील राहिले पाहिजे. दिलेल्या परवानग्या रद्द करून हे बांधकाम थांबवले पाहिजे. दरम्यान, गोवा पर्यटन विकास महामंडळाने लावलेल्या एका फलकावर नमूद करण्यात आले आहे की, भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या प्रसाद योजनेअंतर्गत बॉम जीझस बॅसिलिकाजवळील सुविधा विकसित केल्या जात आहेत. या प्रकल्पात पार्किंग लॉटचा समावेश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. स्थानिक नागरिक आणि पर्यावरण प्रेमींनी सरकारला लोकांच्या भावनांचा आदर करण्याचे आवाहन केले आहे. कोणताही प्रकल्प हा लोकांच्या मताचा विचार करून व्हायला हवा. सरकारने लोकांशी संवाद साधूनच निर्णय घ्यावेत, अशी मागणी पंच सदस्य सारिका नाईक यांनी केली. या आंदोलनामुळे सरकारवर स्थानिकांच्या मागण्यांचा पुनर्विचार करण्याचा दबाव वाढला आहे. पुढील काही दिवसांत प्रशासनाची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### तुये रुग्णालय सुरू करा

की, आमदार प्रवीण आर्लेकर आणि जीत आरोलकर यांनी आगामी विधीमंडळ अधिवेशनात हा विषय सरकारपुढे मांडून ठोस आश्वासन घ्यावे. आरोग्यमंत्र्यांनी डिचोली तालुका दत्तक घेतला, मडकईत हॉस्पिटल सुरू करणार आहेत, मग पेडणे तालुक्याची उपेक्षा का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ८० कोटींहून अधिक खर्च झालेल्या तुये रुग्णालयाकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्र्यांनी त्वरित बैठक घेऊन तोडगा काढावा. स्थानिक आमदारांनी केवळ तारखा न देता ठोस पाठपुरावा करावा, अशी मागणी समितीने केली आहे. पेडणे आणि मांद्रे परिसरातील जनतेच्या भावनांशी खेळ केला जात असल्याचा आरोप कृती समितीने केला आहे. गेली अनेक वर्षे रखडलेल्या तुये रुग्णालयाच्या प्रश्नावर सरकार गंभीर नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे या प्रश्नावर लवकरात लवकर तोडगा निघावा, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा समितीने दिला आहे.



म्हापसा : हुतात्म्याच्या स्मारकाला अभिवादन करताना लोकमित्र संस्थेचे सदस्य व इतर.

# लोकमित्र म्हापसातर्फे हुतात्मा दिन गांभीर्याने साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २३ :** लोकमित्र म्हापसा या संस्थेने म्हापसा नगरपालिकेसह संयुक्त विद्यमाने आजच्या शहीद दिवसानिमित्ताने क्रांतिवीर चौकात हुतात्मा स्मारकाला पुष्पचक्र, हार व फुले तसेच शब्दसुमने अर्पण करून उपस्थित सर्वांनी पुष्पांजली अर्पण करून हुतात्मा दिन साजरा केला. सदर प्रसंगी म्हापशाच्या नगराध्यक्षा सौ. प्रिया मिशाळ प्रामुख्याने उपस्थित होत्या. त्यांचे हस्ते शहीद भगतसिंग सुखदेव थापर व शिवराम राजगुरू यांच्या हुतात्मा चौकातील स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करण्यात येऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. नंतर लोकमित्र चे अध्यक्ष श्री अविनाश बेळेकर व प्रशांत बर्वे यांनीही स्मारकाला पुष्पचक्र अर्पण केले .

प्रशांत बर्वे यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रिया मिशाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. भगतसिंग राजगुरू व सुखदेव यांच्या बलिदानाची आठवण करून देणारे सबंध गोव्यातील हे एकमेव स्मारक असल्याचे सांगून त्यांनी त्यांचे हे बलिदान पुढे जाऊन भारताचे स्वातंत्र्य प्राप्तीस कारणीभूत ठरल्याचे त्या म्हणाल्या. विशितले हे कोवळे तरुण नेहमीच आपल्याला प्रेरणा देत राहतील असे सांगून यंदाचे हे त्यांच्या बलिदानाच्या स्मृतिदिनाचे ९४वे वर्ष असल्याचे त्या म्हणाल्या. त्यानंतर म्हापशाचे माजी नगराध्यक्ष संदीप फळारी यांनीही तीनही शहिदांनी दिलेल्या बलिदानाची, त्यांनी केलेल्या असीम त्यागाची ,अंगावर रोमांच उभे करणारी कहाणी सांगितली. विद्या प्रबोधिनीचे प्राध्यापक तसेच स्वामी विवेकानंद केंद्राचे संयोजक प्रा. श्रीवल्लभ केळकर यांनीही तीनही वीरांनी आपल्या अनमोल प्राणांचे बलिदान देऊन निर्माण केलेल्या जाज्वल्य इतिहासाला आपल्या भाषणातून उजाळा दिला. असे कितीतरी अनाम वीर आपल्या स्वातंत्र्यासाठी धारातीर्थी पडले असल्याचे सांगून कित्येक जणांच्या त्यागाची नाही चिरा नाही पणती अशी अवस्था असल्याचे ते म्हणाले. २३ मार्च या दिवसाचा इतिहास शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या रक्ताच्या शाईने लिहिलेला असून त्यासाठीच तर लोकमित्राने या इथे हुतात्मा स्मारक उभे करून सबंध गोव्याला आदर्श घालून दिलेला आहे. या कोवळ्या युवकांना एक दिवस अगोदरच फाशी देण्यात येऊन त्यांच्या प्रेतांची सुद्धा योग्य रीतीने विल्हेवाट लावली गेली नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांना एकत्र जाळले गेले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या बलिदानातूनच स्वातंत्र्याची पहाट उगवली असल्याचे ते म्हणाले. अहिंसेने नव्हे तर हिंसेनेच आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असल्याचे ते म्हणाले.

उपस्थित सर्वांनी सर्वात शेवटी स्मारकावर फुलांची ओंजळ रिती करून भावांजली वाहिली. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव अमर रहे च्या घोषणा देत कार्यक्रमाची सांगता झाली. यंदा प्रथमच प्रिया मिशाळ हिच्या नेतृत्वाखाली म्हापसा नगरपालिकाही कार्यक्रमात सहभागी झालेली. श्री विजय तिनईकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुरेंद्र (यशवंत) शेट्ये यांनी केले.

इतर उपस्थितात सर्वस्वी तुषार टोपले, अविनाश बेळेकर, रवी कोळसकर, रमेश नाईक, चंद्रकांत पंडित, दामोदर नाटेकर, दिलीप पेडणेकर, अनिल,कामगार नेते क्रिस्तोफर फोन्सेका, राजन घाटे, विजय भिके, अमर कवळेकर, सौ.घाटे, एकनाथ म्हापसेकर, महाबळेश्वर वालावलकर व नारायण खराडे आवर्जून उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

I **PARAMITA CHATTERJEE** D/o Mr. Arun Kumar Chatterjee, R/o Aspen 501 Sankalp Central Park, Yadavagiri Mysore, Hobbalu, Karnataka. I wholly relinquish the use of my former name/surname **AFSHEEN SUHAIL.** Henceforth in all dealings and correspondence will be in name of **PARAMITA CHATTERJEE.**

**CHANGE IN NAME**

I **SHASHIKANT VASSUDEV NARVEKAR** R/O H NO 257/A, GHORBHAT VADDO, ARPORA, BARDEZ, GOA. like to change my name from **SECHICANTA NARVENCAR** to **SHASHIKANT VASSUDEV NARVEKAR**. Hereafter in all my dealing and documents I will be known by the name **SHASHIKANT VASSUDEV NARVEKAR.**

**VILLAGE PANCHAYAT KARAPUR - SARVAN**
**TAL. BICHOLIM - GOA P.H. 2364273**

Ref No. VP/KS/2024-2025/2584 Date: 19/03/2025

**TENDER NOTICE**

The Sarpanch of Village Panchayat Karapur - Sarvan, Taluka Bichollm - Goa invites sealed percentage rate tenders from the eligible contractors registered with State of Goa PWD upto 12.00 noon on Dt. 05/04/2025 for the following work.

| Sr. No. | Name of work | Estimate cost put to Tender in Rs. | EMD (in Rs.) | Class of Contractor | | Time Limit | Cost of Tender Forms in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | As per old registration | As per new registration | | |
| 1. | Tileing and Plumbing work for newly constructed Panchayat Building of V.P. Karapur Sarvan Bicholim Goa under XV fin fund | 475191.62/- | 9504/- | IV (BLDG) and above | V (BLDG) and above | 90 days | 4000/- |

**Terms and conditions:**

1. Last date of receiving application dt **01/04/2025 up to 12.00 noon.**
2. Date of Payment of tender form on dt. **03/04/2025 u p to 12.00 noon.**
3. Date of issue of blank tender form dt. **04/04/2025 up to 12.00 noon.**
4. Date of receipt of sealed tender dt. **05/04/2025 up to 12.00 noon** and will be opened on same day at 3.00 pm.
5. Application for issue of tender form shall be accompanied with
a) Attested copy o f valid registration certificate of the contractor in the concerned category of work.
b) Attested copy o f PAN card.
c) Copy of valid GST registration Certificate and acknowledgement of up to date filed returns with ARN (Application Reference Number) generated on GST common portal.
6. EMD shall be in form of Demand Draft / Deposit Call Receipt (DCR) Pay order from Nationalised or Scheduled bank drawn in favour of The Sarpanch, V.P. Karapur - Sarvan Payable at Village Panchayof Karapur - Sarvan.
7. Contractor shall submit separate application for each work.
8. Unsealed and conditional tenders will be rejected outright.
9. The contractor shall quote the tender excluding GST & GST as applicable shall be paid separately on total value o f work executed.

SEAL

Sd/- **SARPANCH,**
Village Panchayat, Karapur - Sarvan

# भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयात सृजन सप्ताह साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड




**साखळी, दि. २३ :** पर्ये–सत्तरी येथील श्री भूमिका शिक्षण संस्थेच्या श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयात सृजन सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहात विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांना वाव देण्यासाठी विविध कलात्मक आणि बौद्धिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नेहरू युवा केंद्राचे कालिदास घाटवळ हे उपस्थित होते.त्यांच्यासोबत श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यशवंत सावंत,संस्थेचे खजिनदार शंकर चारी, व्यवस्थापक शिवाजीराव राणे, संस्थेचे सचिव कुष्ठा राणे उपप्राचार्य रावसाहेब राणे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली.उपप्राचार्य रावसाहेब राणे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक केले. तसेच युक्ता गाड हिने प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे सृजन सप्ताहात घेतलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. पाककला स्पर्धेत मयूर साळसकर, वेदांगी च्यारी, द्विती गावडे. पोस्टर स्पर्धेत अलविरा बेग व नीती साळगावकर, सोनम सैनी व प्रिया वागर, वेदांगी च्यारी व साईशा गावस यांना पारितोषिके प्राप्त झाली.

या दोन्ही स्पर्धा राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत शिक्षक योगेश गावकर यांनी घेतल्या.

वाद विवाद स्पर्धेत दूर्वा राणेसरदेसाई व नियती नाईक यांना प्रथम, समर्थ कर्पे व समीक्षा नाईक यांना द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.या स्पर्धेचे संयोजक शिक्षक रत्नदीप वेरेकर, वर्षा नाईक व पूजा पाटील होत्या.

केक बनविणे पाककला स्पर्धेत पलक मळीक, माही हजारे, धारणा गावस, दीक्षा राणे यांना पारितोषिके प्राप्त झाली. या स्पर्धेचे संयोजक शिक्षक संदेश सावंत व योगेश गावकर होते. पुष्पगुच्छ बनविणे स्पर्धेत युक्ता गाड, जिया केसरकर, शर्वरी नाईक, तेजा माजीक, साईच्छा गोवेकर व सितम गोवेकर यांना प्राप्त झाले. तर या स्पर्धेचे संयोजक शिक्षक अमोल वझे व शिक्षिका प्रिया म्हापसेकर होत्या.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत शिवेश घाडी, श्रेयश बाणावलीकर, समर्थ कर्पे, चैतन्य जोशी, लक्ष्मण पर्येकर,हना शेख या विद्यार्थ्यांना पारितोषिक प्राप्त झाली. या स्पर्धेचे संयोजक शिक्षिका रक्षमा साळकर व शिक्षिका अनिशा च्यारी होत्या.

रांगोळी स्पर्धेत भूमी पार्सेकर, दिव्या गावस, अर्पिता नाईक, अश्विनी नारोजी, धनराज च्यारी, सहदेव म्हाळशेकर या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली. या स्पर्धेचे संयोजक शिक्षिका सौ.वैष्णवी गवाणकर आणि शिक्षिका अंकिता गावस होत्या.

टाकाऊतून टिकाऊ स्पर्धेत इशा केरकर, भूमी पार्सेकर, आदित्य गावडे, अनुराग गावस, अश्विनी नारोजी, नियती नाईक या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली. या स्पर्धेचे संयोजक शिक्षिका तृप्ती कवळेकर व बबीता नार्वेकर होत्या.

पोस्टर रंगविणे या स्पर्धेत भूमी पार्सेकर,सोनम सायनी, अलविरा बेग यांना पारितोषिके प्राप्त झाली.या स्पर्धेच्या संयोजक शिक्षिका सुनिता गावकर व शिक्षिका सौ.विविधा हळदणकर होत्या.

यावेळी घाटवळ यांनी मुलांना आपल्या अंगी शिस्त बाळगायला सांगितली. आपल्या पालकांना सदैव मान दिला पाहिजे. त्यांचे ऐकले पाहिजे. मोबाईलचा वापर जास्त न करता गरज असेल तेव्हाच करावा असे सांगितले. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका ममता पडते गावस यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# सर्वणमधील घोडेमोडणी मोठ्या उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ढोल ताशाच्या गजरात गाव दुमदुमला

**डिचोली, दि. २३ :** येथील सर्वण गावात गावातील प्रसिद्ध घोडेमोडणी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. होळी पौर्णिमेच्या दिवशी होळी साजरी केल्यानंतर दुसऱ्या दिवशी राखण्याची होळी झाल्यानंतर चोर हा पारंपरिक खेळ साजरा करण्यासाठी प्रत्येक घरासमोर शबय मागितली जाते, त्यावेळी घरातल्या काही वस्तू ज्यात नारळाच्या वड्या, काळींग शिऱ्या, कणगी आलेल्या लोकाना दिल्या जातात अशा प्रकारे चोर साजरे केले जाते.

तिसऱ्या दिवसा पासून संपूर्ण गावात रोमाट खेळले जाते व होळीच्या पाचव्या दिवशी घोडेमोडणी सर्वण गावात भाटले या परिसरात घोडेमोडणी खेळली जाते. या परिसरात एकुण पाच फेऱ्या होहो वो होव्हा हो हो होव्हा या गजरात व ढोल ताशाच्या गजरात दोन घोड़े व गावकर मंडळीतर्फे फेऱ्या मारल्या जातात.

यावेळी लग्न झालेलेच घोड़े म्हणून त्याना नेसवले जाते. यावेळी संदेश सोनु सावंत आणि योगेश रायु सावंत याना घोडे नेसण्याचा मान मिळाला होता. घोडे मोडणीच्या नंतर होमखणच्या निखाऱ्यातून सलग पाचदिवस शाकाहारी राहिलेली मंडळी व वर्षानुवर्षे चालत आलेले गावकर मंडळी चालत जातात. होमखंण झाल्यानंतर नाटकाचा प्रयोग सादर झाला.

होळीच्या नवव्या दिवशी गावातली कुळदेवी प्रत्येक घरात जाऊन त्याना न्हावण देईल व त्यानंतर सलग पाचदिवस सर्वण, वाठादेव, नायंगिणी, कोळमी धाट, आधार नगर, गोविंद नगर, एकता नगर ह्या परिसरातील घरात. जाऊन घरातल्या मंडळीना न्हावण आणी आशिर्वाद देते. व नंतर कौलोत्सव साजरा करून महाप्रसाद म्हणून पारंपरिक कुळथाची पीठी आणी खतखते व उकडा भात अशा जिन्नस महाप्रसाद म्हणून वाढला जातो.

# मेळाव्यातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

## चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर : हरमल पंचक्रोशीत भाऊसाहेब बांदोडकर जयंती 'फन डे' साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड



हरमल : भाऊसाहेब बांदोडकर यांच्या तसबीरीस पुष्पहार अर्पण करताना चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर. सोबत मुख्याध्यापिका स्मिता पार्सेकर, समीर तीळवे, राघोबा गावडे, तन्वी नाईक, मिरा केपकर व इतर.

**हरमल, दि. २३ :** हरमल पंचक्रोशी संस्थेत आनंद मेळावा आयोजन करून विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव तसेच निखळ आनंद देण्याचा प्रयत्न आहे.अश्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आनंदातून शिक्षण लाभदायी ठरेल, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री तथा पंचक्रोशी शिक्षण संस्थेचे चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर यांनी व्यक्त केले.

सदर कार्यक्रम हायर सेकंडरीच्या राजांगणात साजरा केला. पहिले मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांची जयंती व पूर्व प्राथमिक विभागातर्फे 'फन डे'अर्थात आनंद मेळावा, निमित्तच्या सोहळ्यात बोलत होते. भाऊसाहेब बांदोडकर यांची जयंती म्हणजे गोव्याच्या भूमीत कलाटणी देणारा क्षण आहे. शिक्षणाला प्राधान्य देत गावात व वाड्यावड्यवर शाळा सुविधा उपलब्ध केल्या. वंचित समाजाचा शिक्षणाचा पाया मजबूत केला. अल्पशिक्षित असूनही शिक्षणासारख्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली, त्याच्या दूरदृष्टीचा विकास अपेक्षित आहे, असे माजी मुख्यमंत्री पार्सेकर यांनी व्यक्त केले.

समाजाचे भवितव्य शाळेत घडत असते.त्यामुळे शिक्षणाचा पाया मजबूत असल्यास जीवन अर्थपूर्ण होईल.सद्या शिक्षण खात्याने नर्सरी, केजी, पहिली व दुसरी हे फाऊंडेशन विभाग म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे,सादर केलेल्या स्वागत गीतात,विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास दिसून आला.शाळेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले व घेत आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य आहे. हरमल, पालये, केरी तसेच आरोंदा भागातील मुले फाऊंडेशनमध्ये प्रवेश घेऊन, हरमलच्या या संस्थेत अकरावी, बारावी तसेच शिक्षणशास्त्र महविद्यालय व नर्सिंग कॉलेज सुविधा असल्याने मुलांना प्रवेश घेत असले तरी या संस्थेत आधुनिक व उच्च अद्ययावत प्रयोगशाळा,स्मार्ट क्लासरूम व उच्च विद्या विभूषित अध्यापक वर्ग असल्याने शक्य आहे, असे पार्सेकर यानी नमूद केले. शाळा व्यवस्थापन उत्कृष्ठ कार्य करीत असून मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक उपक्रम राबवून मुलांत धीटपणा निर्माण करीत असल्याबद्दल समीर तीळवे यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी मुख्याध्यापिका स्मिता पार्सेकर यांनी प्रास्ताविक भाषणात फाऊंडेशन विभागाच्या पालक शिक्षक संघाने 'फन डे'ची संकल्पना मांडली होती.त्यानुसार नियोजन करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी हा उपक्रम सुरू केल्याचे,मुख्याध्यापिका पार्सेकर यांनी व्यक्त केले.अध्यक्ष समीर तीळवे,उपाध्यक्ष राघोबा गावडे, खजिनदार तन्वी नाईक,

उप खजिनदार गणेश वस्त, सचिव शिक्षिका प्रियांका हरमलकर,मिरा केपकर,संगीता कांबळी, जानवी इब्रामपुरकर, राजेश केरकर उपस्थित होते. लहान मुलांनी स्वागत गीत सादर केले, त्यांना दशरथ नाईक, रोहित कदम व जिग्नेश पेडणेकर यांनी साथ दिली.

शिक्षिका नाईक यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन प्रियांका ठाकूर तर उपाध्यक्ष राघोबा गावडे यांनी आभार मानले.